# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक १७/०३/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १७/०३/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, पाणी पुरवठा, आरोग्य व कर विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | विशेष रस्ता योजनेअंतर्गत रेल्वे स्टेशन रोड ते मालधक्का पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनविणे व एका बाजूने नाली बांधकाम करणे |
| २ | १५ वित्त आयोग योजनेअंतर्गत शिवाजीनगर भागातील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व बांधकाम करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत |
| ३ | नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत प्रभाग क्र २ शिवाजीनगर वार्डातील एदलाबाद रस्त्याचे सौंदर्यकरण करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत |
| ४ | वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत गणेश प्रिंटिंग प्रेस पासून ते मन्नालाल कन्हैयालाल संचेती यांच्या दुकानापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनविणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत |
| ५ | वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नगरपरिषद हद्दीतील माता महाकाली नगर येथील स्मशानभूमी विकसित करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत |
| ६ | नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना जिल्हास्तर अंतर्गत करावयाच्या विकास कामांना मंजुरात मिळणे बाबत |
| ७ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरे वस्ती सुधार योजनेअंतर्गत करावयाच्या विकास कामांना मंजुरी देण्याबाबत |
| | पाणी पुरवठा विभाग |
| ८ | राधाकिसन चाळ प्रभाग क्र ५ आणि वकीलवाडी भागातील जुनी पाईपलाईन बदलून नवीन पीव्हीसी १० इंची पाईपलाईन टाकण्याबाबत |
| ९ | प्रभाग क्र १२ जलशुद्धीकरण केंद्र ते भीमनगर शौचालयापर्यंत १० इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याबाबत |
| | आरोग्य विभाग |
| १० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मोबाईल टॉयलेट खरेदी करणे बाबत |
| ११ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान १.० अंतर्गत विविध कारणास्तव बचत झालेल्या निधीतून ग्रेडर मशीन खरेदी करणे बाबत |
| १२ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत १.० व्यतिरिक्त जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून |

| | |
|---|---|
| | क्षेपणभूमीची जमीन पुन्हा प्राप्ती करणे बाबत |
| १३ | स्वछोत्सव २०२३ अंतर्गत विविध उपक्रम राबवण्यासाठी मान्यता मिळणे बाबत |
| | कर विभाग |
| १४ | थकीत मालमत्ता धारकाची विद्युत नाहरकत रद्द करणे बाबत |

**विषय क्र.१ :- विशेष रस्ता योजनेअंतर्गत रेल्वे स्टेशन रोड ते मालधक्का पर्यंत सिमेंट काँक्रीट रोड बनविणे व एका बाजूने नाली बांधकाम करणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार अमित मदन जाधव यांना विशेष रस्ता योजनेअंतर्गत रेल्वे स्टेशन रोड ते मालधक्क्या पर्यंत सिमेंट काँक्रीट रोड बनविणे व एका बाजूने नाले बांधकाम करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/३२१९/२०२१ दिनांक २३/१२/२०२१ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.२ :- १५ वित्त आयोग योजनेअंतर्गत शिवाजीनगर भागातील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व बांधकाम करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार काद्री ख्वाजा वाजिदुल्ला यांचे अर्जानुसार त्यांना १५ वा वित्त आयोग योजने अंतर्गत शिवाजीनगर भागातील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व बांधकाम करणे या कामाचा कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/२४६६/२०२१ दिनांक ०१/१०/२०२१ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता परंतु, सदर मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामात ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे कामास ६ महिने मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत प्रभाग क्र २ शिवाजीनगर वार्डातील एदलाबाद रस्त्याचे सौंदर्यकरण करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार काद्री ख्वाजा वाजिदुल्ला यांना नगरोत्थान महा अभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत प्र. क्र. २ शिवाजीनगर वार्डातील एदलाबाद रस्त्याचे सौंदर्यकरण करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/१२६७/२०२१ दिनांक ०६/०७/२०२१ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत गणेश प्रिंटिंग प्रेस पासून ते मन्नालाल कन्हैयालाल संचेती यांच्या दुकानापर्यंत सिमेंट काँक्रीट रोड बनविणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार रझाउल्ला खान यांना वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत गणेश प्रिंटिंग प्रेस पासून ते मन्नालाल कन्हैयालाल संचेती यांच्या दुकानापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बनविणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/२२४५/२०२१ दिनांक १७/०९/२०२२ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नगरपरिषद हद्दीतील माता महाकाली नगर येथील स्मशानभूमी विकसित करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार काद्री ख्वाजा वाजिदुल्ला यांना वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नगरपरिषद हद्दीतील माता महाकाली नगर येथील स्मशानभूमी विकसित करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/२८१३/२०२१ दिनांक ०३/११/२०२१ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना जिल्हास्तर अंतर्गत करावयाच्या विकास कामांना मंजुरात मिळणे बाबत.**

प्रशासकीय सभा ठराव क्र २ दिनांक १९/१२/२०२२ नुसार नगरपरिषद मलकापूर क्षेत्रात विशिष्ट नागरी सेवा योजनेअंतर्गत खालील विकास कामाच्या कार्यवाहीस व येणारा खर्च विशिष्ट नागरी सेवा योजना निधीतून करण्यास सभेने मान्यता प्रदान केली होती

१) नगरपरिषद हद्दीतील पुरोहित कॉलनी मधील ओपन स्पेस मध्ये सभागृहाचे बांधकाम करणे.

उपरोक्त कामाचे अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक मंजुरातील मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव यांचेकडे सादर करण्यात आल्यानुसार त्या संबंधित विभागाकडून तांत्रिक मंजुरी सुद्धा प्रदान करण्यात आली. सदर कामाकरिता सभेने विशिष्ट नागरी सेवा योजनेअंतर्गत निधीतून करण्यास मंजुरी प्रदान केली असून ही योजना राज्यस्तरीय असून जिल्हास्तर नाही. तरी सदरचा प्रस्ताव हा नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेअंतर्गत घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरे वस्ती सुधार योजनेअंतर्गत करावयाच्या विकास कामांना मंजुरी देण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालामध्ये मा. अशांतभाई वानखेडे नगरसेवक प्र. क्र. १३ यांचे पत्रानुसार नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून खालील कामे करणे गरजेचे असल्याचे नमूद केले असून मा. मुख्याध्यापक ली. भो. चांडक विद्यालय व

कनिष्ठ महाविद्यालय मलकापूर व भारतीय नागरिक उत्थान समिती खामगाव शाखा मलकापूर यांचे मागणी पत्रात नमूद केले आहे ती कामे खालील प्रमाणे

१) अब्दुल हमीद चौक ते नूतन विद्यालय दोन्हीही बाजूने नाणी बांधकाम करणे व दोन्हीही बाजूने पेवर ब्लॉक बसवणे.

२) पाणीपुरवठा पंपिंग स्टेशन पासून तुळजाई संकुल पर्यंत नागरी वस्ती विकास निधीतून तयार केलेला रस्ता कॉंक्रिटीकरणाचे दोन्हीही बाजूने पेवर ब्लॉक बसविणे.

३) भीम नगर येथे प्रवेशद्वार बांधणे.

४) बुलढाणा रोड पासून ते रामदेव बाबा नगर पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने पेवर ब्लॉक बसवणे.

उपरोक्त कामांची नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी स्थळ पाहणी केली असता सदर कामे ही आवश्यक असुन सदर कामांसाठी आवश्यक निधीकरिता मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदरची कामे करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.८ :- राधाकिसन चाळ प्रभाग क्र ५ आणि वकीलवाडी भागातील जुनी पाईपलाईन बदलून नवीन पीव्हीसी १० इंची पाईपलाईन टाकण्याबाबत.**

वरील विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर न. प. हद्दीतील राधाकिसन चाळ प्र. क्र. ५ मध्ये सिमेंटची पाईपलाईन अंदाजे ४० वर्षा अगोदर टाकण्यात आलेली असून सदर पाईपलाईन बरीच जुनी झालेली असल्याने बदलणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. तसेच मा. एकनाथराव खडसे विधान परिषद सदस्य तथा माजी मंत्री यांचे दि ०९/०२/२०२३ चे पत्रा नुसार त्यांनी मा. ना. श्री गुलाबराव पाटील मंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तथा पालक मंत्री बुलढाणा यांचे कडे सदर कामा करिता निधी उपलब्ध करण्याकरिता प्रस्ताव पाठवला आहे. त्यानुसार राधाकिसन चाळ आणि वकीलवाडी भागातील जुनी पाईपलाईन बदलून नवीन पीव्हीसी १० इंची पाईपलाईन टाकण्याच्या कामास तसेच येणारा खर्च नागरोत्थान निधी, आमदार निधी, खासदार निधी, वैशिष्ट्यपूर्ण निधी, अथवा १५ वा वित्त आयोग निधी, अथवा इतर उपलब्ध निधीमधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.९ :- प्रभाग क्र १२ जलशुद्धीकरण केंद्र ते भीमनगर शौचालयापर्यंत १० इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याबाबत.**

वरील विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता न.प. मलकापूर यांनी सादर केलेला अहवालानुसार पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्र ते भीम नगर पर्यंत असलेली ६ इंची लोखंडी पाईपलाईन ही खूप वर्ष जुनी असून गंजलेली असल्यामुळे लोकांना लाल रंगाचा पाणी पुरवठा होत आहे. तसेच अनेकदा झालेल्या रस्त्याच्या नूतनीकरणाच्या कामामुळे भर पडली असून आज रोजी ही पाईपलाईन जमिनीच्या जवळपास ५ ते ६ फुट खाली असून त्या ठिकाणी अतिक्रमण सुद्धा करण्यात आलेले आहे. तसेच या भागातील पाणीपुरवठा वाढल्याने नागरिकांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नाही. त्याचबरोबर या

पाईपलाईन वर असलेले नळ कनेक्शन ही जुनी असून नालीच्या खालून गेली असल्याने नळ कनेक्शन अथवा पाईपलाईन लिकेज झाल्यास नागरिकांना घाण पाण्याचा पुरवठा होतो व लिकेज शोधण्यासही अडचण निर्माण होत असते. त्यामुळे सदर ठिकाणी जुन्या पाईपलाईन ऐवजी नवीन १० इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याच्या कार्यवाहीस तसेच येणारा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१० :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मोबाईल टॉयलेट खरेदी करणे बाबत.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान १.० अंतर्गत मा. कक्षा अधिकारी यांचे दिनांक १४/०३/२०२३ चे पत्रानुसार दिनांक ०३/०३/२०२३ रोजी मा. मुख्य सचिव महोदय यांच्या मंत्रालयातील दालनात झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्रातील नगरपरिषद यांच्याकडून अतिरिक्त फिरते शौचालय ची मागणी करण्यात आली होती त्याला सदर सभेमध्ये मान्यता मिळाली असून शासनाकडून अतिरिक्त फिरते शौचालय साठी २८३ नगरपरिषद करिता २९.९२ कोटींची मंजुरात मिळालेली आहे. त्या अनुषंगाने मा. सह आयुक्त न.प. प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे दि. ०८/०३/२०२३ चे पत्रानुसार न.प. मलकापूर साठी फिरते शौचालयास एकूण १० नग करिता ६,53,३४०/- रु मंजूर करण्यात आले असून सदर फिरते शौचालय GEM पोर्टलवरून तात्काळ खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.११ :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान १.० अंतर्गत विविध कारणास्तव बचत झालेल्या निधीतून श्रेडर मशीन खरेदी करणे बाबत.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान १.० अंतर्गत मा. सह आयुक्त न.प. प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे दि. ०८/०३/२०२३ चे पत्रानुसार DPR Changes निधी खर्च करावयाचा असून रु ८.४९ लक्ष इतका निधी शिल्लक राहत आहे. सदर शिल्लक निधीतून मलकापूर शहरातील न.प. ची शिक्षेपण भूमीवर टाकण्यात येणारा कचरा बारीक करण्यासाठी अंदाजे १२ लक्ष रु किंमतीच्या श्रेडर मशीन खरेदी करण्याकरिता Revise DPR मध्ये मंजुरात मिळाली असून त्यासाठी निधी मंजूर झाला आहे. तरी सदर मशीन गेम पोर्टलवरून तत्काळ खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१२ :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत DPR १.० व्यतिरिक्त जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून क्षेपणभूमीची जमीन पुन्हःप्राप्ती करणे बाबत.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० (नागरी) अंतर्गत कचरामुक्त शहर करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र शासनाने नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेतील जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासंबंधी (Bio mining) करण्यास आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने न.प.च्या क्षेपणाभूमीवर अंदाजे ७९१३ जुन्या कचऱ्याचे Bio mining बाकी असून मा. राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे दिनांक १३/०३/२०२३ च्या पत्रानुसार न.प. मलकापूरच्या क्षेपणाभूमीवर MIS च्या माहितीनुसार ६००० मॅट्रिक टन कचऱ्याचे Bio mining करिता शासनाकडून रुपये ३३ लक्ष रु निधी मंजूर

झाला असून सदर काम करण्यासाठी नियमानुसार सर्व प्रक्रिया करून ई-निविदा राबवण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१३ :- स्वछोत्सव २०२३ अंतर्गत विविध उपक्रम राबवण्यासाठी मान्यता मिळणे बाबत.**

मा. राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांचे दि. ०९/०३/२०२३ च्या पत्रानुसार मलकापूर शहरात स्वछोत्सव २०२३ अंतर्गत खालील उपक्रम राबवायचा आहे.

१) स्वच्छता जागृती फेरी व स्वच्छता शपथ दिनांक २९,३० किंवा ३१ मार्च २०२३ जागतिक शून्य कचरा दिन

सदर उपक्रम राबवण्यासाठी बॅनर,हँड होल्डिंग, टी-शर्ट इत्यादी नवीन साहित्य खरेदी व छपाई करणे गरजेचे असून त्याकरिता अंदाजे १ लक्ष रुपये खर्च आहे. तरी सदर उपक्रम राबवण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च IEC किंवा CB च्या फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१४ :- थकीत मालमत्ता कर धारकाची विद्युत नाहरकत रद्द करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून कर अधीक्षक मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मालमत्ता कर व पाणीपट्टी कर थकीतदार यांचे प्रमाण खूप असून वसुलीचे प्रमाण अत्यल्प आहे. हे प्रमाण कमी करण्या करिता थकीत कर धारकांनी मालमत्ता व पाणीपट्टी कराचा भरणा तत्काळ करण्यासाठी थकीतदारांचे विद्युत नाहरकत रद्द करण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार सदर कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**